# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## (महसूल शाखा)

---

**जा.क्र.२०१७/महसूल/टंचाई/कावि-६२५** **दि.०९.०५.२०१७**

**फेर ई-निविदा प्रसिध्दी सूचना**
**<u>जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर</u>**

**अ.** लातूर जिल्हयातील पाणी टंचाई असलेल्या गावे व वाडया / तांडे यांना पिण्याचा पाण्याचा पुरवठा करणेसाठी खाजगी टँकर / ट्रक पुरवठा कंत्राटदारासाठीची फेर ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त फेर ई-निविदा बाबतचा फॉर्मची विक्री व स्विकृती व निविदा उघडण्याची कार्यवाही पुढील प्रमाणे राहिल.

| अ.क्र. | खाजगी टँकर / ट्रक पुरवठा कंत्राटदारासाठीची ई-निविदा | कालावधी | |
|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ |
| १ | निविदा प्रसिध्दी | ११.०५.२०१७ | स. १०.०० वा. |
| २ | निविदा विक्री सुरुवात | ११.०५.२०१७ | स. १०.०० वा. |
| ३ | निविदा विक्री शेवट | १९.०५.२०१७ | दु. ११.०० वा. |
| ४ | निविदापुर्व सभा | १६.०५.२०१७ | स. ११.०० वा. |
| ५ | निविदा स्विकृती सुरुवात | ११.०५.२०१७ | स. १०.०० वा. |
| ६ | निविदा स्विकृती शेवट | १९.०५.२०१७ | दु. ११.०० वा. |
| ७ | तांत्रिक निविदा उघडणे | २०.०५.२०१७ | स. ११.०० वा. |
| ८ | आर्थिक निविदा उघडणे | तांत्रीक निविदा पात्र ठरल्यानंतर उघडण्यात येईल. | |

निविदा फॉर्म विक्री व स्विकृतीची कार्यवाही वरील कालावधीत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येईल. दि 20/05/2017 रोजी तांत्रीक लिफाफा उघडण्यापूर्वी कार्यालयीन वेळेत सर्व निविदाधारकांनी जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे (मॅन्युअल) तांत्रिक लिफाफा सादर करणे आवश्यक आहे अधिक माहिती उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सविस्तर निविदा सुचना http://latur.nic.in वरही उपलबध आहे.

<u>अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात लातूर यांचे दुरध्वनी क्र. 02382- 220204 संपर्क साधावा.</u>

**जिल्हाधिकारी, लातूर करीता**



दु.(02382-220204, फॅक्स- (02382-222330)
संकेतस्थळ : www.latur.nic.in E-mail ID- laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com
www.revenue.latur@gmail.com

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## (महसूल शाखा)

---

जा.क्र.2017/महसूल/टंचाई/कावी-525 दिनांक:09.05.2017

**फेर ई - निविदा सुचनाः-**

11 मे 2017 ते 19 मे 2017 या कालावधी करीता लातूर जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणा-या गावांना / वाडी, तांडयांना टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी अनुभवी व सक्षम कंत्राटदाराकडून याव्दारे ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहे.

इच्छुक कंत्राटदारांनी दिनांक 19/05/2017 पर्यंत कार्यालयीन वेळेत ई-निविदा - http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात. फेर ई-निविदा दिनांक 20/05/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे ऑनलाईन पध्दतीने - उघडण्यात येतील. ज्या कंत्राटदारांना काळया यादीत घोषीत केले असेल किंवा त्याबाबत कार्यवाही सुरु असेल त्यांनी किंवा त्यांचेशी संलग्न असलेले कंत्राटदारांनी ई-निविदा भरु नयेत. अशा कंत्राटदारांनी ई-निविदा भरल्यास त्यांची ई-निविदा विचारात घेतली जाणार नाही.

1. ई-निविदाचे फॉर्म दि **11/05/2017 ते 19/05/2017** या कालावधीत http://mahatenders.gov.in कार्यालयीन वेळे पर्यंत **नापरतावा रक्कम रु. 10,000/- (रु. दहा हजार फक्त)** चा E-Receipt तांत्रिक लिफाफा क्र. 1 मध्ये स्कॅन स्वरुपात जमा करणे आवश्यक आहे. सदरचा ई निवेदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
2. ई-निविदाच्या तपशिलवार अटी / शर्ती ई-निविदा फॉर्म सोबत दिल्या जातील.
3. ई-निविदा दोन लिफाफे पध्दतीने भरावी लागेल.

**अ) लिफाफा क्रमांक (1): "तांत्रिक निविदेचा लिफाफा"**

ई- निविदा उघडण्याच्या दिवशी वैध असलेले खालील कागदपत्रे क्रमांक 1 मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

1. या लिफाफ्यात इसार (रक्कम) रु. **1,00,000/- (अक्षरी एक लक्ष)** चा ऑनलाईन मोडव्दारे जमा करावी त्याची E-Receipt सादर करावी.

2. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा समाधानकारक केलेला असलेबाबतचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद, तहसिलदार व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र असावे.

3. सक्षम अधिका-याचे आयकर नोंदणी प्रमाणपत्र अथवा निविदाधारक आयकरदाता असल्याबाबतचा पुरावा.

4.

मालकीच्या किमान 10 (दहा) वाहनाच्या ई-निविदापत्रकामध्ये दिलेल्या विहित नमुन्यात माहिती द्यावी.

अ. प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे वाहनांची नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र (आर. सी. बुक प्रती)

ब. वाहनाचे वाहन कर व विमा भरणा केले बाबतचे प्रमाणपत्र

क. टँकर / ट्रक सुस्थितीत असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे फिटनेस व टॅक्स भरणा केलयाचे प्रमाणपत्र

5. भागीदारी संस्था असल्यास सहाय्यक निबंधक भागीदारी संथा यांचे प्रमाणित प्रत व संस्थेचा दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल (मत्ता- दायित्वासह)



दु.(02382-220204, फॅक्स- (02382-222330)
संकेतस्थळ : www.latur.nic.in E-mail ID- laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com
www.revenue.latur@gmail.com

6. ई-निविदा मान्य झाल्यानंतर यशस्वी निविदा धारकास (कंत्राटदारास) सुरक्षा ठेव म्हणून तात्काळ अनामत रक्कम **रु.1,77,600/-** (अक्षरी एक लक्ष सत्याहत्तर हजार सहाशे मात्र) तहसिलदार, सर्वसाधारण यांचे खालील खात्यात RTGS ने निविदा अंतिम झाल्या नंतर तीन दिवसाचे आत वर्ग करावेत.

Name Of Account - Tahsildar General Latur

Account Number - 62002413415

Bank & Branch - State Bank Of Hydrabad Collector Complex Branch Latur

IFSC Code - SBHY 0021055

Type Of Account - Saving

वरील सर्व प्रमाणपत्राच्या सांक्षाकित सत्यप्रती लिफाफा क्रमांक 1 मध्ये सादर कराव्यात व तांत्रिक लिफाफ्यामध्ये वरील प्रमाणे 1 ते 6 प्रमाणित कागदपत्रे नसल्यास निविदाधारकाचा लिफाफा क्रमांक 2 व्यापारी लिफाफा उघडला जाणार नाही. लिफाफा क्र. 1 मध्ये कोणतेही मुळ प्रमाणपत्रे सादर करु नयेत. मात्र लिफाफा क्रमांक 1 मध्ये सादर केलेल्या प्रतीची मुळ प्रमाणपत्रे निविदा उघडतेवेळी निविदा धारकांनी पडताळणीसाठी स्वतः जवळ ठेवणे आवश्यक राहील. यांची निविदा धारकांनी नोंद घ्यावी

**ब) लिफाफा क्रमांक (2):**

**"या लिफाफ्यामध्ये ई-निविदा फॉर्ममध्ये विहित केलेल्या प्रपत्रात दर भरुन पूर्ण ई- निविदा फॉर्म अटी व शर्तीसह सादर करावा". सदर लिफाफ्यावर टंचाईग्रस्त गावासाठी पिण्याचा पाणी पुरवठा सन 2017-18 दर पत्रकाचा लिफाफा असे लिहावे.**

1. ई-निविदा उघडण्याची तारीख, वेळ तसेच अटी व शर्तीमध्ये बदल करणे आवश्यक असल्यास बदलण्या बाबतचे अधिकार जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे राखून ठेवले आहेत.
2. लिफाफा क्रमांक (1) अगोदर उघडला जाईल. त्यामधील कागदपत्रे विहित केल्यानुसार नसतील तर लिफाफा क्रमांक लिफाफा क्रमांक (2) उघडला जाणार नाही. म्हणजेच ती निविदा विचारात न घेता नामंजुर करुन दप्तर जमा केले जाईल.

ई-निविदा सुचना वेबसाईट http://latur.nic.in वरही उपलबध आहे.

**स्थळः लातूर**
**दिनांकः 09/05/2017**

**जिल्हाधिकारी, लातूर करीता**



दु.(02382-220204, फॅक्स- (02382-222330)
संकेतस्थळ : www.latur.nic.in E-mail ID- laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com
www.revenue.latur@gmail.com

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## (महसूल शाखा)

---

जा.क.2017/महसूल/टंचाई/कावि-　　　　　　　　　　　　　　दिनांकः 09.05.2017

**परिवहन निविदा**

**टँकर / ट्रक भाडयाने लावणेसाठी निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.**

1. कंत्राटदारांचा कालावधी 1 एप्रिल 2017 ते 31 मार्च 2018 या मुदतीपर्यंत अंमलात राहिल.
2. टँकर / ट्रक पुरवठा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी लातूर अथवा ते ज्या अधिका-यांना प्राधिकृत करतील अशा अधिका-यांनी लेखी आदेश दिलेल्या तारखेपासून 24 तासाच्या आत नमुद केलेल्या ठिकाणी संबंधित अधिका-याकडे सुपुर्द करावे लागतील. आवश्यकतेनुसार वाहने लावणे अथवा बंद करणेचे अधिकार प्राधिकृत अधिका-यांना राहतील.
3. टँकर / ट्रकचे दर सर्व समावेशक असावेत त्याबाबत इतर कोणतीही भरपाई दिली जाणार नाही.
4. शासन निर्णय क्रं.टंचाई 2012/प्र.क्रं.53/पापू-14 दि.30 एप्रिल 2012 नुसार विहीत केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्रं. | टँकर/ट्रकवरील पाणी वहन करण्याची क्षमता | कमाल प्रतिदिन भाडे (रुपये) | कमाल प्रतिकिलोमीटर भाडे (रुपये) |
|---|---|---|---|
| 1 | 1 मे.टन | 158.00 | 2.00 |

वरील दरापेक्षा कमी दर राहतील हे निविदा धारकांनी पहावे.

5. पुरविण्यात येणा-या प्रत्येक वाहनाचे किलो मीटर दर्शविणारे मीटर चालू स्थितीत असावे. त्याशिवाय वाहने स्विकारण्यात येणार नाहित.
6. वाहने लातूर जिल्हयातील कोणत्याही गावी क - वर्गीय नगरपालिकासह व एकाचवेळी एकापेक्षा जास्त गावांना वाडयांना, वस्त्यांना एका वाहनाव्दारे पाणी पुरवठा करण्यासाठी उपयोगात आणन्यात येतील.
7. कंत्राटदारांची वाहने आवश्यकतेप्रमाणे लावण्यात येतील. ही आवश्यकता जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी ठरवतील. याबाबत कंत्राटदारास एकूण किती वाहने पुरवावे लागतील हे भविष्यात निर्माण होणा-या पाणी टंचाई परिस्थितीवर अवलंबुन राहील.
8. वाहनावरील टाक्याची स्वच्छता राखणे, दुरुस्त ठेवणे व पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठा करणे यासाठी कंत्राटदार जबाबदार राहील.
9. निवेदेतील मान्य दराने व क्षमतेने प्रत्यक्षात पाणी वाहतूक केल्यानुसार भाडयाची अदाई केली जाईल. तसेच वाहने भाडयाने लावतांना टँकर्सचा प्राधान्यक्रमाने विचार केला जाईल.
10. पाणी वाहतूकीसाठी आवश्यक असणा-या 10,000 ते 12,000 लिटर्स लोखंडी टाक्या निविदाधारकास स्वतःच आणाव्या लागतील व याबाबत वेगळे भाडे दिले जाणार नाही. वाहनावर बसविण्यात येणा-या टाक्या चढविणे, उतरविणे व त्याच्या मजबुतीसाठी वेल्डींग करणे इत्यादीसाठीचा संपूर्ण खर्च कंत्राटदारास सोसावा लागेल. त्याची भरपाई कंत्राटदाराला दिली जाणार नाही.
11. वाहनाचे भाडे पाणी भरण्याचे ठिकाणापासून ते ज्या गावात पिण्याचे पाणी पुरवठा केला जाईल तेवढया अंतरासाठी येण्या-जाण्याच्या जवळचे अंतरावर दिले जाईल.
12. पाणी भरण्याचे ठिकाण संबंधित पंचायत समिती कार्यालयामार्फत दर्शविण्यात येईल. दर्शविलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणावरुन जर पाणी पुरवठा कंत्राटदारांनी केला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. व त्याचे भाडे दिले जाणार नाही.
13. प्रत्येक वाहनाची रोजनिशी (लॉगबुक) संबंधित गावचे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी ठेवतील व वाहनाचे किलामीटर वरुन झालेल्या रिडींग वरुन लॉगबुकात नोंद घेतील व हे लॉगबुक संबंधित गट विकास अधिकारी यांनी शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. 1002/प्रक्र.290/पापु-14 दिनांक 19 सप्टेंबर



दु.(02382-220204, फॅक्स- (02382-222330)
संकेतस्थळ : www.latur.nic.in E-mail ID- laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com
www.revenue.latur@gmail.com

2002 मधील तरतुदीनुसार व प्रचलित शासन निर्णय/ परिपत्रकानुसार प्रमाणित केल्यानंतर बिलाची रक्कम अदा केली जाईल.

14. कंत्राटदारांनी स्पष्ट आदेश नसतांना वाहने तयार ठेवल्यास त्याबाबत वेगळा मोबदला देता येणार नाही.
15. वाहनांचे भाडे शासनाकडून जसजसे अनुदान उपलब्ध होईल त्याप्रमाणे अनुदान मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांचेकडे वर्ग करुन संबंधित गट विकास अधिकारी यांचे मार्फत नियमानुसार वितरीत करण्यात येईल.
16. ज्या कॉन्ट्रक्टरचे / ठेकेदाराचे दर मान्य केले जातील यांना सेक्युरिटी डिपॉझीट रुपये.**1,77,600/-** (अक्षरी एक लक्ष सत्याहत्तर हजार सहाशे मात्र) तहसिलदार, सर्वसाधारण यांचे खालील खात्यात RTGS ने निविदा अंतिम झाल्या नंतर तीन दिवसाचे आत वर्ग करावेत.

Name Of Account - Tahsildar General Latur

Account Number - 62002413415

Bank & Branch - State Bank Of Hydrabad Collector Complex Branch Latur

IFSC Code - SBHY 0021055

Type Of Account - Saving

17. अ)जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर पाणी पुरवठा न केल्यास किंवा विलंबाने केल्यास प्रतिदिन प्रति टॅंकर रुपये 15,000/- (अक्षरी पंधरा हजार मात्र) किंवा जिल्हाधिकारी निश्चित करतील त्या दराने त्यापैकी जास्तीची रक्कम असलेल्या दराने दंड आकारुन वसूल करण्यात येईल.

    ब)जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर पाणी पुरवठा न केल्यास अथवा पाणी पुरवठयाचे काम असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास किंवा निवीदेतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास कंत्राटदारास दिलेले काम काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी लातूर यांचा राहिल व पाणी पुरवठयासाठी दुस-या कंत्राटदाराकडून काम करुन घेतले जाईल. त्याप्रित्यर्थ मंजूर दरापेक्षा ज्यादा लागणारा जास्तीचा खर्च व फरकाची रक्कम मूळ कंत्राटदाराकडून वसूल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी लातूर यांना राहिल.
18. कंत्राटदारास निविदेच्या कालावधीत दररोज काम देणे बंधनकारक राहणार नाही. लातूर जिल्हयात निर्माण होणा-या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी लातूर यांना राहिल.
19. प्राप्त निविदापैकी कोणतीही/कोणत्याहि निविदा स्विकृत करण्याचा व कोणतेही कारण देता निविदा रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी लातूर यांना राखून ठेवले आहेत.
20. कंत्राटदार जलस्त्रोत ते पाणी पुरवठा ठिकाण यातील किलोमीटर अंतराचे भाडे अनुज्ञेय राहील.
21. जर विधीग्राहय दोन किंवा अधिक निविदामध्ये दिलेले दर सारखेच असतील तर याबाबत जिल्हाधिकारी लातूर यांचा निर्णय अंतिम राहिल.
22. ज्याची निविदा स्विकृत करण्यात येईल त्या कंत्राटदारास रुपये 100/- (अक्षरी रुपये शंभर मात्र) स्टॅम्प पेपरवर तात्काळ करारनामा विहित नमुन्यात करुन द्यावा लागेल. करारनामा जरी केला असला तरीही कोणतेही कारण न देता करार रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी लातूर यांना राहतील.
23. कंत्राटदाराचे वाहन नादुरुस्त झाल्यास, इंधन अभावी अथवा इतर कोणत्याही कारणामुळे पाणी पुरवठयाचे काम न करता वाहन उभे राहिल्यास त्याचे भाडे अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही.
24. कंत्राटदारांनी निविदेत दिलेले दर निविदा मंजूर झाल्यापासून ते दि. 31/03/2018 पर्यंत बंधकारक राहतील.
25. कंत्राटदारास भारतीय दंड संहितेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली असल्यास/ काळया यादीत घोषीत केले असल्यास किंवा त्याबाबत कारवाई सुरु असल्यास अशा कंत्राटदारांनी स्वतः किंवा त्याचे नातेवाईकांचे



दु.(02382-220204, फॅक्स- (02382-222330)
संकेतस्थळ : www.latur.nic.in E-mail ID- laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com
www.revenue.latur@gmail.com

नावाने निविदा भरु नये, अशा कंत्राटदारांना देण्यात आलेले कंत्राट रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी लातूर यांना राहतील.

26. निविदा देणारी सहकारी संस्था असेल तर संस्था नोंदणी प्रमाणपत्र, बॉयलॉज सोबत जोडावे तसेच संस्थेच रोख भांडवल किती उपलब्ध आहे त्याचा तपशील जोडावा. ही कागदपत्रे लिफाफा क्रमांक 1 मध्ये ठेवण्यात यावीत. निविदाधारकांनी सहकारी संस्थाने संपूर्ण जिल्हयासाठी कामाचे दर द्यावयाचे आहेत. जिल्हयातील एखाद्या किंवा तालुक्याचा दर दिल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.
27. ठेकेदारास उपठेकदाराची नेमणुक करता येणार नाही.
28. शासनाचे आदेशानुसार व नियमानुसार आयकर व त्यावरील सरचार्ज रक्कम अनुज्ञेय देयकातून परस्पर कपात करण्यात येईल. आयकर खात्याने आयकर अथवा व्याजाची अथवा दंडाची मागणी केल्यास त्याची भरपाई ठेकेदारास करावी लागेल.
29. फक्त खाजगी माऊन्टेड टँकरना प्राधान्य देण्यात येईल 10 मे. टन व 12 मे. टन क्षमतेचे खाजगी टँकर उपलब्ध करुन देणे बंधकारक राहिल. जर वर विहित केलेल्या क्षमतेचे माऊन्टेड टँकर उपलब्ध न झाल्यास तसेच खाजगी ट्रक्सवर टाकी ठेवून त्याचे रुपातंर टँकरमध्ये केल्यास प्रत्येक ट्रकची पाणी वाहन्याची क्षमता व तो ट्रक प्रत्यक्षात किती पाणी वाहतो हे लक्षात घेऊन निश्चित केलेल्या दराच्या प्रमाणात खाजगी ट्रकला भाडे देण्यात येईल.
30. शासन परिपत्रक क्रमांक टंचाई -3003/प्र.क्र.-14/ पापु-14 दिनांक 27 फेब्रुवारी 2003 नुसार पुरवठादाराकडे स्वतःचे किती टँकर्स / ट्रक्स आहेत तो समाधानकारकरित्या काम करु शकेल की, नाही याची खात्री करुनच निविदा मंजूर करण्यात येईल याबाबत कोणताही आक्षेप मान्य केला जाणार नाही.
31. जिल्हयाच्या कोणत्याही भागात टँकरव्दारे पाणी पुरवठा करतांना द्यावा लागणारा पथकराची जबाबदारी कंत्राटदाराची असेल.
32. शासन परिपत्रक टंचाई 2013 प्र.क्रं.418/पा.पू.14 दि.04.01.2014 व पत्र शासन पत्र क्रं.टंचाई 2014 प्र.क्रं.20 पा.पू. 14 दि.15.03.2014 व व शासन परिपत्रक दि.01.10.2014 अन्वये दिलेल्य निर्देशानुसार खाजगी टँकर वाहतूक धारकांनी "पाणी पुरवठा करणा-या टँकरवर GPS प्रणाली बसवल्यानंतर GPS प्रणालीवर ज्या टँकरच्या फे-यांची नोंद होईल त्याच फे-या देयकासाठी अनुज्ञेय होतील व ज्या पाणी पुरवठा करणा-या टँकरवर GPS प्रणाली नसेल. त्या टँकर फे-या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. तसेच GPS प्रणालीबाबतची कोणतीही अनियमीतता आढळून आल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल. तसेच टँकरवर GPS यंत्रणा बसविणे व टँकर दुरुस्ती टँकर वाहतुकदाराने स्वखर्चातून करण्यात यावे.
33. वाहनाचे चालू वर्षाच प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र.
34. महाराष्ट्र राज्य अंतर्गत वाहन चालविण्याचा परवाना
35. ई-निविदाकाराने याकामी वापरण्यात येणा-या टँकर वरील वाहन चालकाची यादी, नाव, पत्ता, मोबाईल नंबर इत्यादी तपशीलासह माहिती कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील. याशिवाय प्रत्येक तालुक्यासाठी संपर्क व्यक्तीचे नांव, पत्ती, मोबाईल नंबर देणे आवश्यक राहील.
36. ई-निविदामध्ये नमुद दरात पुढील बाबींचा समावेश असावा. वाहन चालकाची व्यवस्था, त्याचा भत्ता, वाहनांची स्वच्छता, लागणारे इंधन, स्पिडोमीटर / ओडोमीटर / टायर, वाहनाची सर्व प्रकारची दुरुस्तीची व्यवस्था, टोलकर, त्यावरील इतर किरकोळ खर्च या बाबीची वेगळी भरपाई दिली जाणार नाही.
37. टँकरवरील टाक्यांची स्वच्छता राखणे, स्पिडोमीटर्स व ओडोमीटर दुरुस्त ठेवणे व पिण्यासाठी स्वच्छ व निर्जंतूक पाणी पुरवठा करणे यासाठी कंत्राटदार जबाबदार राहील.
38. पाणी पुरवठा कामी लावण्यांत आलेल्या सर्व टँकरची / किंवा कोणत्याही टँकरची, त्याने केलेल्या पाणी पुरवठयाच्या फे-या बाबत, त्याच्या उद्भवाबाबत किंवा इतर तत्सम माहितीसाठी तहसिलदार, गटविकास



दु.(02382-220204, फॅक्स- (02382-222330)
संकेतस्थळ : www.latur.nic.in E-mail ID- laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com
www.revenue.latur@gmail.com

अधिकारी, उपविभागी अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी किंवा या व्यतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी प्राधिकृत करतील असे अधिकारी / कर्मचारी यांना तपासणीचा अधिकार राहील.

39. यशस्वी ई-निविदा धारकाने उपरोक्त प्रमाणे सुरक्षा ठेव रक्कम रु.1,77,600/- (अक्षरी एक लक्ष सत्याहत्तर हजार सहाशे मात्र) या कार्यालया RTGS ने वर्ग केल्यानंतर सदर रक्कम सुरक्षा ठेव म्हणून तहसिलदार, सर्वसाधारण जि.का. लातूर यांचे नावे TDR मध्ये रुपांतरीत करण्यात येईल. सदरील रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही. सदर सुरक्षा ठेव रक्कम जमा केल्यानंतरच यशस्वी कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
40. प्रत्येक टँकरमध्ये Global Positioning System (GPS) मार्फत टँकरची वेळोवेळी Exact Location व टँकरच्या फे-याचे नियमन करणेसाठी शासनाचे स्थाई आदेश व निर्देशानुसार (GPS) उपकरण लावणे व दुरुस्त ठेवणे व संबंधीत कंत्राटदारावर (यशस्वी निविदा धारकावर) बंधनकारक राहील, व (GPS) प्रणालीवर दैनंदिन फे-यांच्या अहवालाची प्रत नियमीतपणे दररोज जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या संबंधीत शाखेत व देयक अदा करणा-या संबंधीत कार्यालयात सादर करणे बंधन कारक राहील, आणि त्या बाबतचा खर्च संबंधीत कंत्राटदारास करावा लागेल.
41. कंत्राटदाराचे वाहन नादुरुस्त झाल्यास, इंधन अभावी अथवा इतर कोणत्याही कारणामुळे पाणी पुरवठयाचे काम न करता वाहन उभे राहिल्यास त्याचे भाडे अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही आणि नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
42. ज्या दिवशी फेरी झाली नाही किंवा जी.पी.एस. अहवाल (०) शुन्य असेल त्या दिवशीचे भाडे अदा करण्यात येणार नाही.
43. कंत्राटाचे कालावधीत वाहनास किंवा वाहनामुळे अपघात होऊन वित्तहानी, जिवीत हानी किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल. याबाबत शासन कोणतेही दायित्व स्विकारणार नाही.
44. वरील अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपुर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला मान्य आहेत. त्याचा भंग केल्यास अथवा त्यानुसार कार्यवाही न केल्यास होणारी दंडात्मक कारवाई / फौजदारी कार्यवाही मला / आम्हाला मान्य आहे.

स्थळ - लातूर
दिनांक -09.05.2017

निविदाधारकाची स्वाक्षरी

निविदाधारकाचे नाव-

संपूर्ण पत्ता-



दु.(02382-220204, फॅक्स- (02382-222330)
संकेतस्थळ : www.latur.nic.in E-mail ID- laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com
www.revenue.latur@gmail.com

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## (महसूल शाखा)

---

फॉर्म नंबरः

पावती क्र.-

दिनांक-

रुपयेः- 10,000/-

टंचाईग्रस्त गांवाना / वाडयांना ट्रक टॅंकरवदारे पाणी पुरवठा करणेसाठी निविदापत्र

---

1. निविदाधारकाचे संपुर्ण नाव व पत्ता -

---

2. वाहनाचा प्रकार (ट्रक / टॅंकर) क्रमांक -

---

3. वाहनाचे क्रमांक -

---

4. वाहनाची क्षमता -

---

5. वाहतुकीचे दर -

---

मी / आम्ही टंचाईग्रस्त गावांना पाणी पुरवठा करण्यासाठीच्या निविदा सुचनातील नियम व अटी पुर्ण पणे वाचून समजून घेतलेल्या आहेत. त्या मला / आम्हाला मान्य आहेत व बंधनकारक राहतील.

स्थळः लातूर

दिनांक -09.05.2017

निविदाधारकाची स्वाक्षरी -

निविदाधारकाचे नाव-

संपूर्ण पत्ता -



दु.(02382-220204, फॅक्स- (02382-222330)
संकेतस्थळ : www.latur.nic.in E-mail ID- laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com
www.revenue.latur@gmail.com